जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 DEC 2024
सकाळ

# 'आविष्कार'मध्ये १९१ प्रकल्पांचे सादरीकरण

## स्पर्धेचा दुसरा दिवस; तीन विजेत्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या दोनदिवसीय विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवात दुसऱ्या दिवशी पदव्युत्तरस्तरीय संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी संशोधन प्रकल्पांचे पोस्टर तसेच मॉडेल्सद्वारे सादरीकरण केले.

आज १९१ संशोधकांनी सहभाग नोंदविला. दरम्यान, काल झालेल्या स्पर्धेचा निकालही सायंकाळी जाहीर झाला. अनुक्रमे पहिल्या तीन विजेत्या प्रकल्पांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात येईल. जिल्हास्तरीय महाविद्यालयीन स्पर्धेच्या फेऱ्यांनंतर आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झाली. रसायनशास्त्र अधिविभागातर्फे महोत्सवाचे संयोजन केले. मानव्यशास्त्र गटात ६७, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा गटात १९, शुद्ध विज्ञान गटात ५६, कृषी आणि पशुसंवर्धन गटात ३८, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान गटात १८ आणि वैद्यकीय व औषधनिर्माण गटात ४४ प्रकल्पांचे सादरीकरण केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आविष्कार संशोधन स्पर्धेच्या ठिकाणी सादर केलेले प्रकल्प पाहण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींची झालेली गर्दी.

### स्पर्धेचा निकाल गटनिहाय अनुक्रमे :

**पदवीस्तरीय स्पर्धा:** मानव्यशास्त्र, भाषा आणि कला:- १. प्रीती भिसे (डी.के.ए.ए. महाविद्यालय, इचलकरंजी), श्रुती माने (महावीर महाविद्यालय), अवंती पाटील (जयसिंगपूर महाविद्यालय), सानिया मुजावर (विलिंग्डन महाविद्यालय), इंद्रायणी महाजन (श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली).

**वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा** : शर्वरी पिसाळ (केबीपी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च सातारा), शर्वरी गुरव (न्यू कॉलेज), सानिया सूर्यवंशी (यशवंतराव चव्हाण आर्टस् कॉलेज, उरूण इस्लामपूर), रामकृष्ण सावंत (तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी), रसिका गायकवाड (विवेकानंद महाविद्यालय).

**शुद्ध विज्ञान** : संचिता श्रीनिवास (केआयटी अभियांत्रिकी), प्रतीक्षा भुजबळ (मुधोजी कॉलेज फलटण), अनुराधा बोरनाईक (देवचंद महाविद्यालय अर्जुननगर), नुपूर काळे (विलिंग्डन कॉलेज), साक्षी शिंदे (दादासाहेब ज्योतीराम गोडसे महाविद्यालय पलूस).

**कृषी आणि पशुसंवर्धन** : विघ्नेश पाटील (न्यू कॉलेज), ताहीर मुल्ला (यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज कऱ्हाड), रितिका कोंडुसकर (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी), जान्हवी पानसरे (राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी साखराळे), यश पाटील (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव).

**अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान** : दीक्षा घोईसावरवाडे (न्यू कॉलेज), प्राची लोकरे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव), श्रुती पाटील (कॉलेज ऑफ नॉन-कॉनव्हेशनल व्होकेशनल ऑफ कोर्स फॉर विमेन), निखिल पाटील (संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग चिंचेवाडी गडहिंग्लज), पद्मावती घाडगे (आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी सांगली).

**वैद्यकीय आणि औषधनिर्माण** : श्रुती किल्लेदार (भारती कॉलेज ऑफ फार्मसी), वैष्णवी सावंत (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कऱ्हाड), ऋषीकेश पाटील (अरविंद गवळी कॉलेज ऑफ फार्मसी सातारा), स्वप्नील माने (वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, कोडोली), अफताब गडकरी (राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज).

**पीएचडी संशोधनस्तरीय स्पर्धा** : मानव्यशास्त्र, भाषा आणि कला : निलम कांबळे (डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव), किरण चौगुले (यशवंतराव चव्हाण कॉलेज उरूण इस्लामपूर), सुनील बुद्धनवार (बळवंत कॉलेज विटा).

**शुद्ध विज्ञान** : ऋतुजा चौगुले (भारती कॉलेज ऑफ फार्मसी), किरण माळी (गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कऱ्हाड), फरिदा इनामदार (कस्तुरबाई वालचंद कॉलेज सांगली), पूजा देशमुख (गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ फार्मसी कऱ्हाड), अनिकेत भोसले (लालबहादूर शास्त्री कॉलेज सातारा).

**कृषी आणि पशुसंवर्धन** : रोहन वखारिया (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव), मनिषा मुरगुडे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव), ललिता दहिवडे (भारती कॉलेज ऑफ फार्मसी), प्रतीक्षा डोंगरे (जीवरसायनशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), सुनीता शिंदे (तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी वारणानगर).

**अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान** : आण्णासाहेब चौगुले (शिवाजी विद्यापीठ), शुभांगी शीद (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव), शुभम गिरीगोसावी (भूगोल अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), अभिजित शेळके (लालबहादूर शास्त्री कॉलेज सातारा).

**वैद्यकीय आणि औषधनिर्माण** : निशा नेर्लेकर (जैवरसायनशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), व्यंकटेश धरणगुत्तीकर (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी), नेहा देसाई (अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी पेठवडगाव), क्रांती कचरे (रसायनशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), विद्या डांगे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी).

22 DEC 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात आयोजित आविष्कार संशोधन स्पर्धेच्या ठिकाणी सादर केलेले प्रकल्प पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी शनिवारी गर्दी केली होती.

# 'आविष्कार'मध्ये १९१ प्रकल्प सादर

## शिवाजी विद्यापीठात आयोजन: सहा श्रेणीमध्ये सादरीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित दोन दिवसीय विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये पदव्युत्तरस्तरीय १९१ संशोधकांनी संशोधन प्रकल्पांचे पोस्टर तसेच मॉडेलसद्वारे सादरीकरण केले.

संशोधकांनी मानव्यशास्त्र, भाषा आणि कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, शुद्ध विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान तसेच वैद्यकीय आणि औषधनिर्माण या सहा श्रेणींमध्ये प्रकल्प सादरीकरण केले. यामध्ये मानव्यशास्त्र गटात १७, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा गटात १९, शुद्ध विज्ञान गटात ५६, कृषी आणि पशुसंवर्धन गटात ३८, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान गटात १८ आणि वैद्यकीय व औषधनिर्माण गटात ४४ इतक्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले.

### स्पर्धेचा निकाल गटनिहाय पुढीलप्रमाणे

- पदवीस्तरीय स्पर्धा : मानव्यशास्त्र, भाषा आणि कला : प्रीती राजू भिसे (डी. के. ए. ए. महाविद्यालय, इचलकरंजी,) श्रुती सुरेश माने (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर), अवंती अरविंद पाटील (जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर)
- वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा : शर्वरी शैलेंद्र पिसाळ (केबीपी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, सातारा)
- शुद्ध विज्ञान : संचिता अजयकुमार श्रीनिवास (केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर)
- कृषी आणि पशुसंवर्धन : विघ्नेश उत्तम पाटील (न्यू कॉलेज, कोल्हापूर)
- अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान : दीक्षा निवास घोईसावरवाडे (न्यू कॉलेज, कोल्हापूर)
- वैद्यकीय आणि औषधनिर्माण : श्रुती प्रशांत किल्लेदार (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर)
- पीएच.डी. संशोधनस्तरीय स्पर्धा : मानव्यशास्त्र, भाषा आणि कला : नीलम बाळकृष्ण कांबळे (डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव)
- शुद्ध विज्ञान : ऋतुजा दत्तात्रय चौगुले (भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर), कृषी आणि पशुसंवर्धन : रोहन रजनीकांत वखारिया (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव)
- अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान : आण्णासाहेब महावीर चौगुले (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)
- वैद्यकीय आणि औषधनिर्माण : निशा अरुण नेर्लेकर (जैवरसायनशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 DEC 2024

तरुण भारत

# 'आविष्कार'मध्ये संशोधकांकडून १९१ प्रकल्पांचे सादरीकरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवात १९१ संशोधन प्रकल्पांचे पोस्टर तसेच मॉडेलद्वारे सादरीकरण केले. संशोधकांमधील सामाजिक जाणिवांचे दर्शन त्यांनी संशोधनासाठी निवडलेल्या विषयांमधून घडले. पहिल्या तीन विजेत्या प्रकल्पांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार आहे. अनेक विषयावरील प्रकल्प मांडण्यात आले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आविष्कार संशोधन स्पर्धेच्या ठिकाणी सादर केलेले प्रकल्प पाहण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींची झालेली गर्दी.

**संशोधन स्पर्धेचा निकाल**

पदवीस्तरीय स्पर्धा: मानव्यशास्त्र, भाषा आणि कला:- प्रिती पिसे (डी.के.ए.एस. महाविद्यालय, इचलकरंजी) प्रथम, श्रुती माने (महावीर महाविद्यालय) द्वितीय, अवंती पाटील (जयसिंगपूर महाविद्यालय) तृतीय, सानिया मुजावर (विलिंग्डन महाविद्यालय, सांगली) चौथा, ऐश्वर्या महाजन (श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली) पाचवा. **वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा:** शर्वरी निसाळ शर्वरी (केबीपी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲंड रिसर्च, सातारा) प्रथम, शर्वरी गुरव (न्यू कॉलेज, कोल्हापूर) द्वितीय, सानिया सूर्यवंशी (यशवंतराव चव्हाण आर्ट्स कॉलेज, उरुण इस्लामपूर) तृतीय, रामकृष्ण सावंत (तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर) चौथा, रसिका गायकवाड (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर) पाचवा. **शुद्ध विज्ञान:** सचिता श्रीनिवास (केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर) प्रथम, प्रतिक्षा मुजवळ (मुधोजी कॉलेज, फलटण) द्वितीय, अनुराधा बोरनाईक (देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर) तृतीय, नुपूर काळे (विलिंग्डन कॉलेज, सांगली) चौथा, साक्षी शिंदे (दादासाहेब ज्योतीराम गोडसे महाविद्यालय, पलूस) पाचवा. **कृषी आणि पशुसंवर्धन:** विग्नेश पाटील (न्यू कॉलेज, कोल्हापूर) प्रथम, ताहीर मुल्ला (यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, कराड) द्वितीय, रितिका कोडुसकर (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर) तृतीय, जान्हवी पानसरे (राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे) चौथा, यश पाटील (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव) पाचवा. **अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान:** दीक्षा घोईसावरवाडे (न्यू कॉलेज, कोल्हापूर), प्राची लोकरे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव) द्वितीय, श्रुती पाटील (कॉलेज ऑफ नॉन-कॉन्व्हेंशनल व्होकेशनल कोर्स फॉर विमेन, कोल्हापूर) तृतीय, निखिल पाटील (संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, चिंचेवाडी, गडहिंग्लज) चौथा, पद्मावती पाडगे (आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली) पाचवा. वैद्यकीय आणि औषधनिर्माण: श्रुती किल्लेदार (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर) प्रथम, वैष्णवी सावंत (सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड) द्वितीय, ऋषिका पाटील (अरविंद गवळी कॉलेज ऑफ फार्मसी, सातारा), स्वप्नील माने (वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, कोडोली) चौथा, अफताब गडकरी (राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर) पाचवा.

**पीएचडी संशोधनस्तरीय स्पर्धा: मानव्यशास्त्र, भाषा आणि कला:**

निलम कांबळे (डी.पी. भोसले कॉलेज, कोरेगाव) प्रथम, किरण चौगुले (यशवंतराव चव्हाण कॉलेज, उरुण इस्लामपूर) द्वितीय, सुनिल बुद्धनवार (बळवंत कॉलेज, विटा) तृतीय. **शुद्ध विज्ञान:** ऋतुजा चौगुले (भारती कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर) प्रथम, किरण गडी (गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कराड) द्वितीय, फरिदा इनामदार (कस्तुरबाई वालचंद कॉलेज) तृतीय, पूजा देशमुख (गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कराड) चौथा, अंकिता भोसले (लालबहादूर शास्त्री कॉलेज, सातारा) पाचवा. **कृषी आणि पशुसंवर्धन:** रोहन वखारिया (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव) प्रथम, मनिषा मुरगुडे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव) द्वितीय, ललिता दहिवडे (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर) तृतीय, प्रतीक्षा डोंगरे (जीवरसायनशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) चौथा, सुनिता शिंदे (कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर) पाचवा. **अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान:** आण्णासाहेब चौगुले (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) प्रथम, शुभांगी शेटे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव) द्वितीय, शुभम गिरीगोसावी (भूगोल अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) तृतीय, अभिजित शेळके (लालबहादूर शास्त्री कॉलेज, सातारा) चौथा. **वैद्यकीय आणि औषधनिर्माण:** निशा नेर्लेकर (जैवरसायनशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ) प्रथम, व्यंकटेश धरणगुत्तीकर (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव) द्वितीय, नेहा देसाई (अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी, पेठ वडगाव) तृतीय, क्रांती कवडे (रसायनशास्त्र अधिविभाग) चौथा, विद्या डांगे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव) पाचवा.

22 DEC 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समग्रतेसाठी नवीन शैक्षणिक धोरणाची देशाला गरज

## डॉ. व्ही. एन. शिंदे : न्यू कॉलेजमध्ये शिक्षण परिषद

कोल्हापूर, ता. २१ : देशाला समग्र करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची गरज आहे. हे धोरण सकारात्मक पद्धतीने राबविल्यास विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित बदल दिसतील. कौशल्यांचे विकसन हा या धोरणाचा आत्मा आहे. हे धोरण राबविण्यामध्ये शिवाजी विद्यापीठ देशात अग्रेसर ठरले आहे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आज येथे केले.

न्यू कॉलेजच्या सभागृहात डॉ. सुनीलकुमार लवटे अमृतमहोत्सव समितीतर्फे आयोजित शिक्षण परिषदेत ते बीजभाषक म्हणून बोलत होते. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, डॉ. व्ही. एम. पाटील, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे संचालक प्रा. विनय पाटील, डॉ. विश्वास सुतार, प्रा. टी. के. सरगर, प्रा. सी. एम. गायकवाड, प्राचार्य प्रभाकर हेरवाडे, संजय कळके आदी प्रमुख उपस्थित होते.

परिषदेचे उद्घाटन डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. डॉ. पाटील यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा बहुजन समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी उपयोग व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. पहिल्या सत्रात प्राचार्य डॉ. जे. के. पवार, मिलिंद यादव, भाग्यश्री कासोटे, प्रा. शशिकला सरगर, डॉ. जी. पी. माळी यांचा विविध पुरस्कार मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दुसऱ्या सत्रात इतिहास संशोधक सदानंद कदम यांनी 'वर्तमान शिक्षणातील लामन दिवे' या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य बी. एम. हिर्डेकर यांनी 'शिक्षक आणि विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'शिक्षकांनी नवोपक्रमांचा वापर करून विद्यार्थ्यांना ज्ञानी करावे.' समारोप सत्रात प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले यांनी परिषदेचे समीक्षण केले. डॉ. लवटे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची वैशिष्ट्ये सांगितली. दीपक जगदाळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. निशांत गोंधळी यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : न्यू कॉलेजच्या सभागृहात शनिवारी आयोजित शिक्षण परिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. विनय पाटील, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्राचार्य जी. पी. माळी उपस्थित होते.

### 'लेखक आपल्या भेटीला' उपक्रम

**वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी आज जिल्ह्यातील १० शाळांमध्ये सकाळी आठ ते १० या वेळेत 'लेखक आपल्या भेटीला' हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी बाबूराव शिरसाट, उत्तम फराकटे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. दिनकर पाटील, डॉ. विनोद कांबळे, प्रा. टी. आर. गुरव आदींनी मार्गदर्शन केले.**

22 DEC 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात शनिवारी न्यू कॉलेजच्या सभागृहात डॉ. सुनीलकुमार लवटे अमृतमहोत्सव समितीतर्फे आयोजित शिक्षण परिषदेत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक सदानंद कदम, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. जी. पी. माळी, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्रा. विनय पाटील, आदी उपस्थित होते.

# माणूस बनविणारा शिक्षक हाच खरा लामणदिवा साहित्यिक

## सदानंद कदम : डॉ. लवटे अमृतमहोत्सवानिमित्त शिक्षण परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : माणूस बनविणारा शिक्षक हाच खरा लामणदिवा असून, त्यांची सध्या समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन इतिहास संशोधक सदानंद कदम यांनी शनिवारी केले. डॉ. सुनीलकुमार लवटे अमृतमहोत्सव समितीतर्फे शनिवारी आयोजित शिक्षण परिषदेत ते बोलत होते. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या न्यू कॉलेजच्या सभागृहात परिषद झाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सदानंद कदम म्हणाले, सध्या भाषा व इतिहास यांची वाट लावण्याचे काम व्हॉटसअॅप विद्यापीठाकडून सुरू आहे. महापुरुषांची बदनामी केली जात आहे. नाटक, टीव्ही मालिका यातून समाज बिघडवण्याचेच काम सुरू आहे. सामाजिक माध्यमांतून विचार बदलण्याचे प्रयत्न होत आहेत. या सर्वातून विद्यार्थ्यांना बाहेर काढण्याचे काम शिक्षकांना करावे लागणार आहे.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, देशाला समग्र करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची गरज आहे. हे धोरण सकारात्मक पद्धतीने राबविल्यास विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित बदल दिसतील. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले.

डॉ. जी. पी. माळी, प्राचार्य डॉ. जे. के. पवार, मिलिंद यादव, भाग्यश्री कासोटे-पाटील, प्रा. शशिकला सरगर यांना विविध पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार झाला.

डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता विकसन या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले यांनी समीक्षण केले. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची वैशिष्ट्ये सांगितली. मेळाव्यास शंभराहून अधिक शिक्षक उपस्थित होते.

डॉ. विश्वास सुतार, संजय कळके, प्रा. सी. एम. गायकवाड, अमेय जोशी, प्रा. टी. के. सरगर, प्राचार्य प्रभाकर हेरवाडे आदींनी संयोजन केले. प्रा. निशांत गोंधळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विनय पाटील, गुरुबाळ माळी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2024
पुण्यनगरी

# योगासन संघाचे सराव शिबिर उत्साहात

**गडहिंग्लज :** येथील ओंकार महाविद्यालयात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी जाणाऱ्या शिवाजी विद्यापीठ योगासन संघाचे सराव शिबिर झाले. यात १६ विद्यार्थी सहभागी झाले. संघास सुरेश धुरे यांनी मार्गदर्शन केले. २४ ते २८ डिसेंबरदरम्यान भुवनेश्वर येथे होणाऱ्या आखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी हा संघ रवाना होणार आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, शरद बनसोडे यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय गणित दिनानिमित्त रविवारी (दि. २२) शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २२ डिसेंबर रोजी शालेय विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड उत्पन्न होऊन ती वृध्दिंगत व्हावी, यासाठी आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'जीवनातील गणित' या विषयावर लेखक व गणिताचे अभ्यासक डॉ. दीपक शेटे यांचे व्याख्यान होणार आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रेझेंटेशन व मॉडेल कॉम्पिटिशन स्पर्धा होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2024
सकाळ

# डॉ. विजय ककडे यांची निवड



डॉ. विजय ककडे

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासन, अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. विजय ककडे यांची सेबीतर्फे वित्त साक्षरतेसाठी तीन वर्षांकरीता (२०२४-२७) राज्यस्तरावर निवड झाली. आर्थिक नियोजन, गुंतवणुकीच्या संधी तसेच फसव्या योजनांपासून सावधनतेसाठी जागरुकता अभियान सेबीतर्फे चालवले जाते. कर्मचारी, विद्यार्थी आणि बचत गटातील महिलांसाठी मोफत व्याख्याने नियोजित केली जातात. डॉ. ककडे यांनी अर्थशास्त्रातील क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ लेखन व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव, वित्त व लेखाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.